# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. सर्वसाधारण सभा दिनांक १८ /०९/२०१७

## सायं ४.३० वा.

| विषयाचे नाव | मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय |
|---|---|
| १) मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १४/०८/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १४/०८/२०१७ रोजीचे इतिवृत्त दुरूस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>अनुमोदक :- (मनिषा जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजूर. |
| २) प्रश्नोत्तरे | |

| अ. क्र | सभेची तारीख | प्रश्नकर्त्या सदस्यांचे नाव व अर्जाची तारीख | विषयाचा तपशील | कार्यवाहीसाठी कोणस पाठविले व तारीख | अर्जदारास उत्तर दिलेबाबत माहीती./तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८/०९/२०१७ | मा.धनंजय गावडे दि. २२/०८/२०१७ | विरार स.नं. ३७७ ब पार्ट, प्लॉट क्र १० या जमिनिवर सुधारीत बांधकाम परवानगी टी.पी/व्ही पी ०७०५/०१३०/२०१२/१३ दिलीबाबत परवानग्या, सुधारीत नकाशाप्रत TDR दिलेबाबत प्रत/ विक्री प्रत इ. माहिती | मा.उपसंचालक नगररचना दि. २४/०८/२०१७ | |
| २ | १८/०९/२०१७ | धनंजय गावडे दि. २४/०८/२०१७ | म.न.पा. हद्दीत पाणी साचण्याच्या जागा त्याचे निरीक्षक, वेळा,कारण यांची माहिती त्याचा अहवाल तसेच सांडपाणी व्यवस्थापन संदर्भात सेवा निर्देशकाची शासन आदेशाची प्रत, अंमलबजावणी कार्यवाही, तसेसच नैसर्गिक प्रवाहावरील अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामाची यादी त्यांचेवर केलेली कार्यवाही याची माहिती | १. मा. शहर अभियंता<br>२. मा.कार्यकारी अभियंता,<br>३. सर्व सहा.आयुक्त A,B,C,D,E,F,G,H,I) | |
| ३ | १८/०९/२०१७ | मा. किरण भोईर | म.न.पा. हद्दीत धोकादायक मिळकती यादी, त्यांना दिलेल्या नोटीसा, धोकादायक बाबत निकष स्थलांतरीत रहिवाश्यांना देय सोयी सुविधा इ माहिती | १. मा.कार्यकारी अभियंता | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १८/०९/२०१७ | मा.किरण चेंदवणकर | मनपा हद्दीतील स्मशानभूमी संख्या, कार्यरत (दिवस/रात्र) संख्या कार्यरत कायम/ठेका कर्मचारी संख्या, लाकडांसाठी गोदाम व्यवस्था कार्मचाऱ्यांचे आरोग्य शिबीर माहीती त्यांना आवश्यक बुट, मोजे, मास्क इ. सुविधा देतात काय? त्यांना ओळखपत्र दिले काय? तसेच N.G.O. ना देणेबाबत प्रस्ताव इ.माहिती. | १. मा.कार्यकारी अभियंता<br>२. मा.सहाय्यक आयुक्त A,B,C,D,E,F,G,H,I) | - |

३) <u>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव.</u>

**ठराव :-** विषय पत्रिकेसोबत शासकीय पत्रे जोडलेले आहेत.

| अ.क्र | शासकिय कार्यालयाचे नाव | पत्र दिनांक | विषय |
|---|---|---|---|
| १. | नगरविकास विभाग | २४/०८/२०१७ | शासकीय योजनांची अमलबजावणी करताना करण्यात येणाऱ्या जाहीरातीं मध्ये अधिकाऱ्यांनी त्यांचे फोटोचा वापर न करण्याबाबत. |
| २. | नगरविकास विभाग | ०१/०९/२०१७ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) OD Watch - शहरांमध्ये हागणदारी होत नाही याबाबत घ्यावयाची दक्षता. |

४) <u>कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर) -१ पद, उद्यान अधिक्षक -१ पद, सहाय्यक उद्यान अधिक्षक -२ पदे, प्रमुख माळी -३ पदे या पदांवर सहा महिन्यांच्या कालावधीसाठी ठोक वेतनावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना मुदतवाढ देणेबाबत.</u>

<u>ठराव/निर्णय :-</u> संगणक विभाग व उद्यान विभागातील कामाची निकड पाहता ठोक वेतनावरील १) हर्षल रघुनाथ पाटिल, कनिष्ठ अभियंता (सॉफ्टवेअर), २) प्रशांत रमेश पाटिल, उद्यान अधिक्षक, ३) ओमकार राजन नार्वेकर, सहाय्यक उद्यान अधिक्षक ४) मयुरकुमार राजन सावळे, सहाय्यक उद्यान अधिक्षक, ५) अजय जगन्नाथ भोईर, प्रमुख माळी, ६) दौलत अमत गोतारणे, प्रमुख माळी, ७) प्रतिक समाधान गाढे, प्रमुख माळी या सात कर्मचाऱ्यांना उद्यान व संगणक विभागातील कामाची निकड लक्षात घेता सन २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या त्रैवार्षिक वित्तीय वर्षाची निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन अभिकर्त्याची नेमणूक होऊन अभिकर्त्यामार्फत ठेका कर्मचारी नेमणूक होईपर्यंत, परंतु सहा महिन्याचे मर्यादेत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन कलम ५३ (३) अन्वये नेमणूक करण्यास, तसेच ठोक वेतनावरील खर्चास आजची ही महासभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. सदर खर्च महानगरपालिकेच्या "वृक्षारोपण/उद्यान मजूर देखभाल" व "सामान्य प्रशासन (ई-गव्हर्नन्स)" या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

**अनुमोदक :- (वृंदेश (उमा) पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

| | |
|---|---|
| ५) वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील अपंग (दिव्यांग) व्यक्तींना विविध योजना व उपक्रमाअंतर्गत लाभ देणेबाबत मा.महासभेची प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **प्रस्तावाचा निर्णय :-** प्रस्तावनेत नमुद विषयावर सविस्तर चर्चा करणेत आली असून त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिकेच्या क्षेत्रातील अपंगांसाठी वरील १ ते ११ सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेकामी धोरणत्मक निर्णय होऊन उपरोक्त सर्व बाबतीत योग्य त्या अटी व शर्ती व अर्ज तयार करुन त्यानुसार योजना राबविणेकरीता सर्व प्रवर्गातील अपंग व्यक्तींकरीता एकमताने चर्चाकरुन येणाऱ्या अपेक्षित खर्चास आजची मा. सर्वसाधारण सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- (वृंदेश (उमा) पाटील) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ६) वसई विरार शहर महानगरापालिका प्रभाग समिती जी मधील वॉर्ड नं. ८८ मध्ये गोखिवरे नाका येथील गोखिवरे विभागीय कार्यालय ते धारकर यांचे घरापर्यंत खडीकरण व पेव्हर ब्लॉकने रुंदीकरण करणेचे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वरिलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ७) प्रभाग समिती आय कार्यालय क्षेत्रातील उमेळा फाटा येथील पापडी औद्योगिक वसाहतीच्या मुख्य प्रवेशद्धाराजवळ अग्निशामक केंद्र बांधणे कामी प्रशासकीय व वित्तिय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ८) प्रभाग समिती डी क्षेत्रातील नवघर (पुर्व) येथे औद्योगीक वसाहती मध्ये अग्निशमन केंद्राची इमारत बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ९) वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती 'डी' मधील वॉर्ड क्र.८३ मधील राज नगर समाज मंदिर ते वृंदावन गार्डन पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे कामाचे अंदाजपत्रकीय रक्कमेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव /निर्णय :-** वरील प्रमाणे प्रस्तावाबाबत सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त नमुद कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात येत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- (रुपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

| | |
|---|---|
| १०) केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात अतिरिक्त पाणी पुरवठा योजना तयार करणेकामी मंजूर विकास आराखडयामध्ये पाण्याची टाकी/जलकुंभ (ESR) चे नविन आरक्षण प्रस्तावित करणे करिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) नुसार केलेल्या कार्यवाहीस अंतिम मान्यता घेऊन प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबत. | **ठराव/निर्णय :-** केंद्रशासन पुरस्कृत अमृत अभियान योजने अंतर्गत वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील अतिरिक्त पाणीपुरवठा योजना तयार करणेकामी गाव मौजे-विरार, स.नं-१६२, हि.नं-४ ब, क्षेत्र १६०० चौ.मी. तसेच गाव मौजे-गोखिवरे, स.नं-११३ पैकी क्षेत्र-१६०० चौ.मी. येथील शासकिय जागेवर पाण्याची टाकी/जलकुंभ (ESR) बांधणेकामी सदर जागेवर पाण्याची टाकी/जलकुंभ (ESR) चे नविन आरक्षण प्रस्तावित करणेसाठी (नकाशा क्र. VVCMC/MOD NO.०१ & ०२/२०१७-१८ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये बदल करुन महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करणेस तसेच सदर जागा शासनाकडून उपलब्ध करुन घेण्याकरिता व नविन आरक्षणाप्रमाणे विकसित करणेस हि सभा अंतिम मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (रुपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |
| ११) वसई विरार शहर महापालिकेची सुर्या पाणी पुरवठा योजनेची मुख्य जलवाहिनी फुटून पाण्याच्या प्रवाहाने मौजे धुकटण जिल्हा पालघर येथील घरांचे/शेतीचे/भाजी पाल्याचे झालेल्या नुकसानीची भरपाई व त्यासाठी केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेबाबत. | **ठराव / निर्णय :-** उपरोक्त विषयाबाबत सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यात आले की, सुर्या योजनेची मुख्य जलवाहिनी फुटल्याने परिसरातील शेतकरी यांचे पीकांचे / भाजीपाल्याचे तसेच घरांचे मोठया प्रमाणावर नुकसानझाल्याने नुकसान बाबत तलाठी सजा गोवाडे, कृषीअधिकारी गोवाडे, सार्व. बांधकाम विभाग, पालघर यांनी केलेल्या पंचनाम्यानुसार व मुल्यांकाप्रमाणे तहसिलदार पालघर यांचेमार्फत महानगरपालिकेस कळविल्यानुसार शेतकरी/घर मालक यांना नुकसान भरपाई अदा करणे कामी केलेल्या निहीत कार्यवाहीस व खर्चास हि सभा आर्थीक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (सुदेश चौधरी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर.** |

**नगरसचिव**

**वसई विरार शहर महानगरपालिका**